International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 7.2 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

# माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास आणि शैक्षणिक संपादनाचा अभ्यास

**देशमुख शीतल दिलीपराव**
संशोधक विद्यार्थी, शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
**डॉ. सूर्यवंशी वैशाली पुंजाराम**
संशोधन मार्गदर्शक, शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**सारांश**

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास हा त्यांच्या शैक्षणिक यशाचा महत्त्वपूर्ण घटक मानला जातो. आत्मविश्वास म्हणजे व्यक्तीच्या स्वतःच्या क्षमतेवर, ज्ञानावर आणि कृतीवर असलेला दृढ विश्वास होय. हा गुण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर थेट परिणाम घडवतो. आत्मविश्वास असलेला विद्यार्थी शिक्षणात अधिक सक्रिय, जिज्ञासू आणि यशस्वी ठरतो, तर आत्मविश्वासाचा अभाव असलेला विद्यार्थी भीती, असुरक्षितता आणि अपयशाच्या मानसिकतेत अडकतो. आजच्या तंत्रज्ञानप्रधान आणि मूल्याधिष्ठित समाजात शिक्षण केवळ ज्ञान देण्याचे साधन राहिलेले नसून व्यक्तिमत्त्व विकासाचे माध्यम बनले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे ही शिक्षक, पालक आणि शाळेची संयुक्त जबाबदारी बनली आहे. या पार्श्वभूमीवर माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि त्यांच्या शैक्षणिक संपादनाचा परस्परसंबंध जाणून घेण्यासाठी हे संशोधन करण्यात आले आहे.

**कीवर्ड्स:** आत्मविश्वास, शैक्षणिक संपादन, माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी, व्यक्तिमत्त्व विकास, शैक्षणिक यश.

**प्रस्तावना:**

आजच्या काळात मनुष्याला जीवन जगण्यासाठी त्याच्यात आवश्यक गुण आणि योग्यता असणे अत्यंत गरजेचे झाले आहे. शिक्षणाशिवाय हे गुण आणि योग्यता अपूर्ण राहतात, त्यामुळे या गुणांचा विकास करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. शिक्षण ही अशी प्रक्रिया आहे जी व्यक्तीच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावते. ती व्यक्तीचे ज्ञान, वृत्ती आणि व्यक्तिमत्त्व विकसित करते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाचे मापन त्यांच्या शैक्षणिक उद्दिष्टांच्या प्राप्तीवरून केले जाते. सध्याच्या काळात शिक्षणाचे महत्त्व अत्यंत वाढले आहे आणि आजच्या युवकांसाठी ते आणखी

आवश्यक बनले आहे, कारण त्यांच्या भविष्यातील पाया शिक्षणावरच आधारित आहे. शैक्षणिक क्षेत्रात यश मिळविण्यासाठी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात परिश्रम करतात. परंतु केवळ परिश्रम पुरेसे नसतात यश मिळविण्यासाठी आत्मविश्वासही तेवढाच महत्त्वाचा घटक आहे. आत्मविश्वास हा असा सकारात्मक दृष्टिकोन आहे जो युवकांना कोणत्याही परिस्थितीत स्वतःला अनुकूल बनविण्याची क्षमता देतो. आत्मविश्वासू विद्यार्थी आपल्या जीवनावर नियंत्रण ठेवतो आणि आपल्या क्षमतांवर दृढ विश्वास ठेवतो. आत्मविश्वासामुळे व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक शक्ती एका निश्चित उद्दिष्टाकडे केंद्रित होतात. तो मनुष्याला आपल्या जीवनातील सर्व परिस्थितींविषयी आशावादी व वास्तववादी बनवतो. आत्मविश्वास हा व्यक्तीची योग्यता, यश आणि कार्यक्षमतेवर थेट परिणाम करणारा घटक आहे.

**माध्यमिक स्तर (Secondary Level)**

माध्यमिक स्तर हा विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रवासातील अत्यंत महत्त्वाचा आणि घडणारा टप्पा मानला जातो. या स्तरावरील विद्यार्थी प्रामुख्याने कुमारावस्थेत (वय १२ ते १६ वर्षे) असतात. या अवस्थेत विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक परिवर्तन वेगाने घडत असते, ज्याचा त्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेवर आणि वर्तनावर लक्षणीय परिणाम होतो. या टप्प्यावर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास विकसित करणे आणि शैक्षणिक संपादन वृद्धिंगत करणे ही शिक्षण प्रक्रियेची प्रमुख उद्दिष्टे ठरतात. आत्मविश्वासाच्या माध्यमातून विद्यार्थी स्वतःच्या क्षमतांची जाणीव करून घेतो, आव्हाने स्वीकारण्याची वृत्ती विकसित करतो आणि यश संपादनासाठी प्रयत्नशील राहतो. आत्मविश्वासपूर्ण विद्यार्थी समस्यांचे निराकरण, तर्कशुद्ध निर्णय घेणे तसेच शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात प्रगती करणे यासाठी अधिक सक्षम ठरतात.

माध्यमिक स्तरावरील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा केवळ ज्ञानविकास न होता त्यांचा आत्मविश्वास, स्वावलंबन, जबाबदारीची भावना आणि सकारात्मक वृत्ती यांचाही विकास साधला जातो. त्यामुळे या स्तरावर शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाच्या वृद्धीसाठी योग्य शैक्षणिक वातावरण, प्रोत्साहन आणि मार्गदर्शन प्रदान करणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांची शैक्षणिक तसेच वैयक्तिक प्रगती सुनिश्चित होईल.

**आत्मविश्वास ( confidence):**

आत्मविश्वास ही यशाची गुरुकिल्ली आहे जीवनात कुठलीही गोष्ट करायची असेल तर त्यासाठी आत्मविश्वास सगळ्यात महत्त्वाचा असतो. आत्मविश्वास हा घटक व्यक्तिमत्त्वाचा एक भाग आहे. एखादी गोष्ट मी करू शकतो हा विश्वास म्हणजे आत्मविश्वास. " आत्मविश्वास म्हणजे आपली क्षमता, मर्यादा लक्षात घेऊन कामे करणे, लहान सहान गोष्टींसाठी विचलित न होणे, स्वतःची तुलना स्वतःशीच

International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 7.2 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

करणे, हाती घेतलेले काम मनापासून पूर्ण करणे होय. कोणतीही संधी मिळवण्यासाठी आत्मविश्वासाची खूप आवश्यकता असते. आणि जर आत्मविश्वासच नसेल तर संधीही अशाच वाया जातात. म्हणून आत्मविश्वास हा घटक खूप महत्त्वाचा समजला जातो.

आत्मविश्वास म्हणजे परिस्थिती संयमाने हाताळण्याची व त्यातून यश अथवा अनुकूलता प्राप्त करण्याची क्षमता होय. ज्या प्रकारे यश आपल्याला मिळवायचे आहे ते मिळवण्यासाठी काय करायला हवे याबद्दलच्या सूचना आपल्या मनातुन येत असतात. सावध राहून या सूचनांची अंमलबजावणी करणे म्हणजेच आत्मविश्वासपूर्ण वर्तन होय. आत्मविश्वास पूर्ण वर्तन ठेवण्यासाठी आपण कोण आहोत, आपले व्यक्तिमत्व कसे आहे, आपल्यातील गुण दोष काय आहेत. याची पूर्ण ज्ञान आपणास पाहिजे. आत्मज्ञान झाल्यावर आपल्याला प्रगतीचा मार्ग निश्चितच सापडू शकेल. प्रगतीपथावरील पदचिन्हांची आपल्याला चाहूल लागली, आपली बुद्धिमत्ता आपली प्रकृती यांची अचूक ज्ञात झाली की आपण निश्चितच पणे जीवनात यशस्वी होणारच असे समजावे यालाच आत्मविश्वास म्हणतात. ( डॉ.कुलकर्णी राम, व्यक्तिमत्व विकास, राहुल बुक सेंटर, नाशिक, 1995, पान नं 60)

"आत्मविश्वास म्हणजे संकल्पनेविषयी आणि स्वतःच्या क्षमते विषयी घटनात्मक अभिवृत्ती होय."

बांदुरा (1986) यांच्या मते आत्मविश्वास हा प्रेरणादायक आणि नियमकांपैकी एक मानला जातो. एखाद्या व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातील वर्तन होय.

Self confidence as faith of own abilities. Dictionary of education -Good(1973)

"आत्मविश्वास म्हणजे संकल्पनेविषयी आणि स्वतःच्या क्षमते विषयी घटनात्मक अभिवृत्ती होय".(http:drashishgurav.ब्लॉगस्पॉट. Com/)

**शैक्षणिक संपादणूक**

विद्यार्थी शालेय जीवनात वेगवेगळ्या स्तरावर शिक्षण घेत असतो. प्रत्येक अभ्यासक्रमाची विशिष्ट उदिष्टे ठरलेली असतात.प्रत्येक इयत्तेच्या अभ्यासक्रमाची उद्दिष्टे कितपत साध्य झाली ते बघण्यासाठी घटक चाचणी, प्रथम सत्र परीक्षा, वार्षिक परीक्षा घेण्यात येतात.या परीक्षांच्या निकालावरून विध्यार्थ्याने त्या इयत्तेत किती शैक्षणिक संपादन केले आहे. सद्य परिस्थिती शैक्षणिक संपादनाला अनन्य साधारण महत्व आहे.

**Crow and Crow (1969)** "शैक्षणिक प्रगती म्हणजे एखादा विद्यार्थी विशिष्ट अध्ययन क्षेत्रातील शिक्षणाचा किती लाभ घेत आहे, हे दर्शवणारी गोष्ट आहेम्हणजेच ., त्याला दिलेल्या ज्ञान व कौशल्याचा किती अंश आत्मसात झाला आहे, हे यामधून दिसून येते".

डी.सी. मॅकले लँड आणि जे डब्लू आटकीन्सन यांच्या मते," सर्वोत्कृष्ट अशी जी काही असेल ते प्राप्त करून घेण्यासाठी स्पर्धा धडपड करणे म्हणजे संपादन करणे होय". (जोशी बी आर 2008, पृ. क्र. 3)

विषयाशी निगडित असलेला अभ्यासक्रम प्राप्त करून घेण्याची क्षमता म्हणजेच विषयातील संपादणूक. ट्रायलर ( १९६४ )यांनी शैक्षणिक संपादनाच्या भविष्यात्मक वैद्यतेची चर्चा केली आहे. त्यांच्या मते "शालेय संपादन प्राप्तांक हे विद्यार्थ्यांच्या भविष्यातील यशाची सर्वोत्तम भागीदरी करणारा घटक आहे" . (http:drashishgurav.ब्लॉगस्पॉट. Com/)

**2. संशोधनाची गरज व महत्त्व**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशामागे केवळ बुद्धिमत्ता किंवा पाठांतर पुरेसे नसते. त्यांच्या मानसिक तयारी, स्वतःविषयीची धारणा, वर्गातील सहभाग, अपयश स्वीकारण्याची क्षमता आणि प्रयत्नशीलता यांनाही तेवढेच महत्त्व असते. या सर्व घटकांमध्ये आत्मविश्वास हा मध्यवर्ती घटक आहे. अनेक वेळा विद्यार्थी बुद्धिमान असूनही कमी आत्मविश्वासामुळे अपेक्षित शैक्षणिक यश मिळवू शकत नाहीत. त्याउलट सरासरी क्षमता असलेले विद्यार्थीही उच्च आत्मविश्वासामुळे चांगली प्रगती करतात.

या संशोधनाची गरज पुढील कारणांमुळे जाणवते

1. माध्यमिक स्तरावरील कुमारवयीन विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासाची पातळी आणि शैक्षणिक प्रगती यांचा संबंध समजून घेण्यासाठी.
2. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अपयशामागील मानसशास्त्रीय कारणांचा शोध घेण्यासाठी.
3. शिक्षक आणि पालकांना विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजांची जाणीव करून देण्यासाठी.
4. शाळांमध्ये समुपदेशन, प्रेरणादायी कार्यक्रम आणि आत्मविश्वास वृद्धी उपक्रमांची गरज अधोरेखित करण्यासाठी.
5. शैक्षणिक संपादणूक वाढविण्यासाठी मानसिक घटकांचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी.
6. हे संशोधन शिक्षक, पालक, समुपदेशक, शाळा व्यवस्थापन आणि शिक्षण संशोधकांसाठी उपयुक्त ठरेल.

**संशोधनाचे गृहितके**

1. पौगंडावस्था ही संघर्ष आणि तणाव तसेच वादळ आणि विरोधाची अवस्था आहे. कौमार्यवरथेमध्ये समायोजन साधन असतांना बऱ्याच संघर्षमय परिस्थितीत निर्माण होणाऱ्या घटकांचा आपण अभ्यास केल्यास कुमारांच्या गरजा आपल्या लक्षात येतील व त्यांना उपयुक्त मार्गदर्शन करता येईल

. (गुल्हाने गजानन व सुत्तरवार श्वेता, डिसें. 2015, बाल्यावस्था व बालविकास, सुविचार प्रथम प्रकाशन मंडळ, पुणे नं. 75)

2. मुलाला एखादी कृती जमली नाही तर त्याचा आत्मविश्वास डाळमळतो. म्हणून मुलाला सुसंगत अशी कौशल्य शिकवणे योग्य ठरते. ( डॉ. दत्तात्रय तापकीर प्रा. विजयकुमार पाईकराव डॉ.मनीषा चित्रे, यशवंतराव चव्हाण, अध्ययनार्थी व त्याचा विकास, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, पान.नं.49)
3. मानसशास्त्रीय चाचणी ही व्यक्तींच्या वर्तनाचा अभ्यास करण्यासाठीची I एक शास्त्रशुद्ध पद्धत आहे. (डॉ. अनिता पाटील, मानसशास्त्रीय चाचण्या नोव्हेंबर 2008- प्रथम आवृत्ती, डायमंड पब्लिकेशन, पा.नं.3)

**संशोधनाची व्याप्ती**

1. प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (State Board) अभ्यासक्रमानुसार शिकणाऱ्या माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.
2. प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही मराठी माध्यमातील इयत्ता नववी च्या विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास व शैक्षणिक संपादनाशी निगडित आहे.
3. हे शैक्षणिक संशोधन विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाच्या पातळीचा त्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर होणाऱ्या परिणामाशी संबंधित आहे.
4. प्रस्तुत संशोधनामध्ये आत्मविश्वास मोजण्यासाठी गाझाला झिया यांनी तयार केलेले आत्मविश्वास मापन स्केल व विद्यार्थ्यांच्या मागील वर्गाच्या वार्षिक परीक्षेतील गुणपत्रकातील निकालाचा विचार केला आहे.

**संशोधनाची मर्यादा**

1. प्रस्तुत संशोधन हे मराठी माध्यमाच्या माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.
2. संशोधनातील निष्कर्ष हे निवडलेल्या मराठी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या प्रतिसादांवर व निकालावर आधारित आहेत.
3. प्रस्तुत संशोधनात आत्मविश्वास व शैक्षणिक संपादन या दोन घटकांचाच विचार करण्यात आला असून इतर मानसिक व सामाजिक घटकांचा विचार केलेला नाही.

**संशोधनाची जनसंख्या व नमुना**

**जनसंख्या:**

International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 7.2 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

नाशिक तालुक्यातील ग्रामीण भागातील मराठी माध्यमाच्या इयत्ता नववीचे सर्व विद्यार्थी हे प्रस्तुत शैक्षणिक संशोधनाची जनसंख्या होती.

**नमुना:**

नाशिक तालुक्यातील ग्रामीण भागातील मराठी माध्यमाच्या शाळांमधून असंभाव्यतेवर आधारित नमुना निवड पद्धतीपैकी सहेतूक नमुना निवड पद्धत वापरली गेली.
या पद्धतीद्वारे वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय, माडसांगवी, नाशिक येथील इयत्ता नववी मध्ये अध्ययन करणारे 100 विद्यार्थी नमुना म्हणून निवडले गेले.

**संशोधन साधने**

1. आत्मविश्वास मापनासाठी गाझाला झिया यांनी तयार केलेले “आत्मविश्वास मापन स्केल (ASCS–ZG)” या साधनाचा वापर करण्यात आला आहे.
2. शैक्षणिक संपादन मापनासाठी – विद्यार्थ्यांच्या मागील वर्गाच्या वार्षिक परीक्षेतील गुणपत्रकातील (Marksheet) निकालाचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास आणि शैक्षणिक संपादनामधील संबंधांचा अभ्यास करणे.
2. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास आणि शैक्षणिक संपादनामधील परस्परसंबंध तपासणे.
3. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थिनींच्या आत्मविश्वास आणि शैक्षणिक संपादनामधील संबंधांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची कार्यपद्धती**

| उद्दिष्ट क्रमांक | उद्दिष्ट | संशोधन पद्धती | संशोधन साधन | संख्याशास्त्रीय प्रक्रिया | नमुना |
|---|---|---|---|---|---|
| 1 | माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचा शोध घेणे . | सर्वेक्षण पद्धती | गाझाला झिया यांची आत्मविश्वास मापन साधन (ASCS–ZG) | शेकडेवारी | वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय, |

International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 7.2 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाचा अभ्यास करणे. | सर्वेक्षण पद्धती | विद्यार्थ्यांच्या मागील शैक्षणिक वर्षाच्या गुणपत्रिकेतील निकाल | शेकडेवारी | माडसांगवी, नाशिक येथील इयत्ता नववी मध्ये अध्ययन करणारे 100 विद्यार्थी |
| 3 | विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास आणि शैक्षणिक संपादनामधील परस्परसंबंध शोधणे. | वर्णनात्मक संशोधन पद्धती | आत्मविश्वास मापन स्केल आणि परीक्षेचा निकाल | पिअर्सन सहसंबंध गुणांक (r) | |

**माहितीचे विश्लेषण व अर्थानिर्वचन**

**उद्दिष्ट क्रमांक १ : माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचा शोध घेणे**

या उद्दिष्टासाठी गाझाला झिया यांची आत्मविश्वास मापन साधन (ASCS–ZG) वापरून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास मोजण्यात आला. मिळालेल्या आकडेवारीवरून विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाच्या पातळीचे वर्गीकरण खालीलप्रमाणे दिसून आले —

| अ.क्र. | वर्गीकरण | टक्केवारी | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | कमी आत्मविश्वास असणारे विद्यार्थी | २०% | २० |
| 2 | मध्यम आत्मविश्वास असणारे विद्यार्थी | ५०% | ५० |
| 3 | उच्च आत्मविश्वास असणारे विद्यार्थी | ३०% | ३० |

**अर्थानिर्वचन:**

वरील तक्त्यांवरून असे दिसते की बहुसंख्य विद्यार्थी (५०%) मध्यम आत्मविश्वासाचे आहेत. उच्च आत्मविश्वास असणाऱ्यांची संख्या ३०% असून, कमी आत्मविश्वास असणारे २०% आहेत. यावरून हे स्पष्ट होते की माध्यमिक स्तरावरील बहुतेक विद्यार्थी आत्मविश्वास विकसित करण्याच्या प्रक्रियेत आहेत आणि शिक्षकांकडून योग्य प्रोत्साहन दिल्यास त्यांचा आत्मविश्वास अधिक वाढू शकतो.

**उद्दिष्ट क्रमांक २ : माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाचा अभ्यास करणे**

International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 7.2 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

या उद्दिष्टासाठी विद्यार्थ्यांच्या मागील शैक्षणिक वर्षाच्या गुणपत्रिकेतील निकालांचा अभ्यास करण्यात आला. मिळालेल्या आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संपादन खालीलप्रमाणे आढळले —

| अ.क्र. | वर्गीकरण | टक्केवारी | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | कमी शैक्षणिक संपादन असणारे विद्यार्थी | २५% | २५ |
| 2 | मध्यम शैक्षणिक संपादन असणारे विद्यार्थी | ४५% | ४५ |
| 3 | उच्च शैक्षणिक संपादन असणारे विद्यार्थी | ३०% | ३० |

**अर्थानिर्वचन:**

बहुतेक विद्यार्थी (४५%) मध्यम श्रेणीत मोडतात, तर उच्च श्रेणीतील विद्यार्थी ३०% आहेत. कमी शैक्षणिक संपादन असणारे विद्यार्थी २५% आहेत. यावरून दिसून येते की विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे आणि आत्मविश्वास या घटकाचा यात महत्वपूर्ण वाटा असू शकतो.

**उद्दिष्ट क्रमांक ३ :**

**विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास आणि शैक्षणिक संपादनामधील परस्परसंबंध शोधणे.**

| अ. क्र. | घटक / वर्गीकरण | विद्यार्थ्यांची संख्या | सहसंबंध गुणांक (r) | स्वातंत्र्याचा अंश (D.F.) | सार्थकता स्तर | अर्थ / निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | आत्मविश्वास व शैक्षणिक संपादन | 100 | +0.802 | 48 | 0.01 व 0.05 स्तरावर | सहसंबंध सार्थक व धनात्मक आहे |

या उद्दिष्टासाठी **पिअर्सन सहसंबंध गुणांक (r)** पद्धतीचा वापर करण्यात आला. मिळालेला सहसंबंध गुणांक **r = +0.802** असा आहे.

अर्थानिर्वचन: सहसंबंध गुणांकाचा धनात्मक )Positive) आणि उच्च मूल्य )0.802) हा आत्मविश्वास आणि शैक्षणिक संपादन यांच्यातील घनिष्ट व सकारात्मक संबंध दर्शवितो म्हणजेच . विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास जितका जास्त, तितकी त्यांची शैक्षणिक कामगिरी सुधारते त्यामुळे . .आत्मविश्वास हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा प्रभावी घटक असल्याचे या संशोधनातून स्पष्ट होते

**संशोधन निष्कर्ष**

सहसंबंध गुणांकाचे विश्लेषण केल्यानंतर असे आढळून आले की माध्यमिक स्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थी, विद्यार्थीनी यांच्या आत्मविश्वास आणि शैक्षणिक संपादनामध्ये धनात्मक व अत्यंत सार्थक सहसंबंध आहे.यावरून हे स्पष्ट होते की विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास त्यांच्या शैक्षणिक संपादनावर थेट परिणाम करतो.

आत्मविश्वास आणि शैक्षणिक संपादन यांच्यामधील समानुपाती आणि धनात्मक सहसंबंध हे दर्शवितात की —जसे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो तसे त्यांच्या शैक्षणिक संपादनातही वाढ होते.

**शैक्षणिक उपयुक्तता**

या संशोधनाद्वारे हे समोर आले आहे की आत्मविश्वास हा गुण विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी तसेच शैक्षणिक प्रगतीसाठी महत्वपूर्ण भूमिका बजावतो. आत्मविश्वासामुळे विद्यार्थी सर्व प्रकारच्या अधिगम (Learning) प्रक्रियेत सक्रीय सहभाग घेतात व त्यांची कौशल्ये विकसित होतात. शैक्षणिक क्षेत्रात आत्मविश्वास वाढल्यामुळे विद्यार्थ्यांची कार्यक्षमता, निर्णयक्षमता व समस्या सोडविण्याची क्षमता सुधारते. म्हणूनच आत्मविश्वास हा शैक्षणिक संपादन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक घटक असल्याचे या संशोधनातून स्पष्ट होते.

**संदर्भ**

1. करंदीकर सु. (जुलै 2007): शैक्षणिक मानसशास्त्र. दुधाळी, कोल्हापूर : फडके प्रकाशन
2. गुल्हाने गजानन, सत्तुरवार रवी (25) डिसेंबर 2013): बालावस्था व बालविकास (प्रथम आवृत्ती) पुणे सुविचार मंडळ प्रकाशन
3. चव्हाण कि. (2010): विकास व अध्ययनाचे मानसशास्त्र. नाशिक : इनसाईट पब्लिकशन
4. चव्हाण वि. मुळे सं.. (2013): शेक्षणिक संशोधनाचा आढावा. द्वितीय आवृत्ती. नाशिक : इनसाइंट पब्लिकेशन
5. चित्ते. हेमंत (2015): शेक्षणिक संशोधन मांडणी व दिशा. नाशिक : सात्विक प्रकाशन
6. जोशी. अं. महाले सं (1999): मुक्त विद्यापीठ संशोधन, पुष्प पहिले, नाशिक : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ.
7. पंडीत. ब (2010) : शिक्षणातील संशोधन. पुणे नित्यनुतन प्रकाशन
8. पाटील गो (मार्च 2016): विज्ञान-आशययुक्त अध्यापन पद्धती. जळगांव : प्रशांत पविनकेशन
9. पाटील. (नोव्हें. 2018): मानसशास्त्रीय चाचण्या. पुणे डायमंड पब्लिकेशन I
10. भंगाळे, शे. (नोव्हेंबर 2011): बालावस्था व वाढते वय. जळगांव : प्रशांत पब्लिकेशन

11. भदाणे, देसले मु. (2011 नोव्हेंबर): शैक्षणिक मुल्यमापन वसंख्याशास्त्र.नाशिक : इनसाइंट पब्लिकेशन
12. भिंताडे, वि.रा. (2004): शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे : नूतन प्रकाशन.
13. मुळे. रा.शं. व उमाठे, वि.तू. (1998): शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे, तृतीय आवृत्ती, ओरंगाबाद महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.
14. मोरे (2010). शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान. पिंपळापूरे अॅण्ड के पब्लीशसं
15. Anne Anastasi, Susana U. (2006): Psychological Testing, First Impression, Seventh Edition, Borase c.(13 Oct. 2013): Mix Method of Research.Pune: Authors Avenue Publications
16. Beady G.L. Shymla M Kusuma A. (2016): Research Methodology of Statistics in Education,
17. Garrett, H.E. (2006): Statistics in Psychology & Education.Delhi: Surjeet Publication
18. Joshi, S.R. (2016): Teaching of Science. APH Publishing
19. New Delhi: DPH. Discovery Publishing House Pvt. Ltd.